# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## फसवणुक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत मौजा गागांपुर झोपडपटटी टाकळघाट ता.हिंगणा जि.नागपुर येथे दिनांक ०७/०२/२०२२ ते दिनांक ०८/०२/२०२२ चे १४.१७ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुमीत शंकर पडोळे, वय २१ वर्ष, रा. ह.मु. भारकस ता. हिंगणा जि. नागपूर याला मोटरसायकल घ्यायची असल्याने त्याने मोबाईल मध्ये ओएलएक्स ॲपवर असलेल्या एमएच— ४९/जीक्यु— ४३९३ क्रमांकाची सीबी शाईन मोटरसायकल अज्ञात आरोपी सोबत संपर्क केला असता फिर्यादीला त्याने मिलीट्रीमध्ये आहे असे सांगितले. यानंतर आरोपीने सदर मोटरसायकलचा फोटो फिर्यादीचे व्हॉटसप ॲपवर पाठवुन त्याची ४०,०००/—रू. किंमत सांगुन फिर्यादीला मोटरसायकल पाठवीतो असे सांगुन वेगवेगळे वेळी गुगल पे व्दारे ४०,०००/—रू. मागणी करून गाडी न पाठविता फिर्यादीचा विश्वासघात करून फिर्यादी कडुन ४०,०००/—रू. घेवुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ (सी) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अशोक कोळी हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत केशव कॉटन जिनींग नरखेड येथे दिनांक ०६/०२/२०२२ चे ११:३० ते दिनांक ०८/०२/२०२२ चे १७:३० वा. दरम्यान **कु.करिना भरूयाराम मरसकोल्हे (मृतक), वय १८ वर्ष रा.रिंगनखापा ता.पांढुर्णा जि.छिंदवाडा म.प्र.** हिने केशव कॉटन जिनींग नरखेड येथे विषारी उंदरे मारण्याचे औषध प्राशन केली. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकरिता नरखेड येथे शासकिय दवाखाण्यात नेले असता प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारादरम्यान तिचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रदीप ठाकुर मेयो पोलीस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक दिनेश वरठे मो. क्र. ७०३८४४५७८२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापा :— अंतर्गत उमरी जांभळापाणी येथे दिनांक ०९/०२/२०२२ चे १८:०० वा. पुर्वी **अनिल सुमरलाल सयाम(मृतक), वय ३० वर्ष, रा. उमरी** याने अज्ञात कारणातुन त्याचे राहाते घरी विषारी औषध प्राशान केले. त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास उपचाराकरीता पीएचसी खापा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रविन्द्र अनिल सुमरलाल सयाम, वय २७ वर्ष, रा. उमरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत वार्ड क्र ५ सटवा माता मंदीर झोपडपटटी सावनेर येथे दिनांक ०९/०२/२२ ते १४.५० वा. दरम्यान **भरत मन्नीलाल कैथेला (मृतक), वय ३० वर्ष रा. वार्ड क्र ५ सटवा माता मंदीर झोपडपटटी सावनेर** हा गांजाचे नशेत आपले राहते घरी गळफास घेतल्यानंतर मृत तो अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीमती लता अशोक चोटेलकर, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र ५ सटवा माता मंदीर झोपडपटटी सावनेर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अजय चौधरी हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**